# पक्षांची किलबिल ऐकण्यासाठी गोव्यात या...

## पर्यटन महामंडळाची यंदापासून जाहिरातबाजी; राज्यात पर्यटनाचा नवा अध्याय

पणजी, ता. १० (प्रतिनिधी) : देशातील १००० हून पक्षांच्या प्रजातींपैकी ४०० प्रजाती गोव्यात आहेत आणि या पक्षांची किलबिल ऐकण्यासाठी, त्यांचे मोहक रंग रूप पाहण्यासाठी गोव्यात या. अशी जाहिरातबाजी यंदापासून सुरु होणार आहे. जागतिक पर्यटनदिनापासून पक्षी पर्यटनाचा नवा अध्याय पुढे नेण्यासाठी तयारी चालू आहे. त्यासाठी 'बर्डस ऑफ गोवा' हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार असून त्या पुस्ताकाचे प्रकाशन आज पर्यटनमंत्री दिलीप परुळेकर यांनी केले.

पक्षी पर्यटनासाठी पर्यटन महामंडळाची जुने गोवे येथील रेसिडेन्सी केंद्रबिंदू होणार असून करमळीचे तळे व आसपासच्या परिसरातील पक्ष्यांना पर्यटकांना पाहता यावे यासाठी सायकली, मार्गदर्शकांची सोय पर्यटन खात्यातर्फे करण्यात येणार आहे, अशी माहिती 'बर्डस ऑफ गोवा'साठी नकाशे, छायाचित्रे, पक्षी निरीक्षणाच्या कालावधीची माहिती संकलित करणारे साविओ फोन्सेका यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. यामुळे छोटे व्यावसायिक तयार होतील व त्यात पक्षी मार्गदर्शक, टॅक्सी वाहनचालक, कॉफी, चहा, खाद्यपदार्थ विक्रेते समावेश असेल, छोट्या घरातील खोल्याही भाड्याने देण्याची सोय

पान २ वर ▶



पणजी : पर्यटक भवनात गुरुवारी "बर्डस ऑफ गोवा'' पुस्तकाचे प्रकाशन करताना पर्यटकमंत्री दिलीप परुळेकर. बाजूस नीलेश काब्राल व अमेय अभ्यंकर. (संदीप देसाई)

### बर्डस ऑफ गोवा पुस्तकात ४८० पक्षांची छायाचित्रे

बर्डस ऑफ गोवा या पुस्तकाचे लेखन विक्रम ग्रेवाल यांनी केले असून पक्ष्यांच्या वागण्याचे तपशील, आवाज, वसाहतींची माहिती आहे. पुस्तकातील चित्रे जगातील ६८ वन्यप्राणी छायाचित्रकारांनी काढली असून त्यात निरंजन संत, गुरुराज मूरचिंग, सुमीत सेन, क्लेमेंट फ्रान्सिस, निखिल देवसर, नितीन श्रीनिवासमूर्ती, रामकी श्रीनिवासन यांचा समावेश आहे. काही छायाचित्रे गोव्यातील ४० ठिकाणी काढली असून त्यात चोर्ला घाट, सांतिनेज, पिळर्ण, आल्त पर्वरी, वेती, खोतीगाव अभयारण्य, शिरोडा, शिरगाव, मडगाव, बागा, आरोशी समुद्रकिनारा, बोंडला अभयारण्य, तांबडीसुर्ला, करमळी तलाव परिसरातील आहेत. ७४ छायाचित्रे १६ वर्षीय एडन फोन्सेका याने दिली आहेत.

# पक्षांची किलबिल ऐकण्यासाठी गोव्यात या...

▶ पान १ वरून

होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. पक्षी (एव्ही) पर्यटनासाठी विदेशी पर्यटक मोठ्या प्रमाणात आकर्षित करून गोव्याला त्याचा फायदा नक्की होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पक्षी पर्यटनासाठी बर्ड इन्स्टिट्यूट ऑफ गोवा या संस्थेशी करार केला असून पक्षीप्रेमी गोव्याकडे वळतील, असा विश्वास पर्यटनमंत्री श्री. परूळेकर यांनी व्यक्त केला. पर्यटन विकास महामंडळाचे अध्यक्ष आमदार नीलेश काब्राल यांनी पक्षी पर्यटनातून गोव्याच्या पर्यटनाला नवी दिशा मिळेल. पर्यटन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निखिल देसाई, मुख्य वनपाल अजय सक्सेना, पर्यटन संचालक अमेय अभ्यंकर यावेळी व्यासपीठावर होते. माजी मुख्यमंत्री शशिकला काकोडकर व त्यांचे पुत्र यतीन काकोडकर, हॉटेल उद्योग क्षेत्रातील राल्फ डिसोझा, गौरीश धोंड, गोवा चेंबरचे माजी अध्यक्ष मांगिरीष पै रायकर तसेच इतर मंडळी यावेळी होती. पर्यटन भवनातील सभागृहात हा कार्यक्रम झाला.

# ‘Birds in Goa’ released



A brown headed Gull and Eurasian Curlew at the Arrossim beach are among the 480 birds featured in the book.

**BY A STAFF REPORTER**
reporters@omantaktimes.com

**Panaji:** Tourism Minister Dilip Parulekar on Thursday released a book titled ‘Birds in Goa’, authored by Bikram Grewal and Savio Fonseca, at Paryatan Bhavan, Patto-Panaji so as to make people aware about the 400-odd species of birds and its distinct sub species in Goa.

The book will serve as the entire guide for tourists where they can get entire idea about locations for bird watching. Also, it contains over 480 full-colour photographs.

The Birds Institute of Goa has taken initiative to launch this book which is also supported by the Goa Tourism Board.

Speaking to reporters, Parulekar said that since last three and half year, the tourism department is trying best to improve the tourism industry. He thanked everyone who had been involved with the book launching and hoped that the book will certainly help people to understand the richness of bird's species in Goa, and will attract more tourists and bird lovers from all over the world to its bird hotspots.

Goa is also expected to be prominently featured as a Bird Watchers Paradise on the global map, Parulekar added.

Speaking regarding the book, one of its authors, Savio Fonseca said “the pictures in the book come from 68 of the best wildlife photographers from India and rest of the world. Some of the images come from legendary wildlife lensmen such as Nirajan Sant, Gururaj Moorching, Sumit Sen, Clement Francis, Nikhil Devasar and many more.

Moreover, these photographs been take from 40 different locations in Goa which includes Chorla Ghat, St Inez, Arossim beach, Bondla wildlife sanctuary, Tambdi Surla and Carambolim lake.

`Birds of Goa’ will hit the book stands soon.

Among the other dignitaries present for the book launch were GTDC chairman and MLA Nilesh Cabral, Chief Secretary R K Srivastava, Principal Chief Conservator of Forests Ajai Saxena, Director of Tourism Amey Abhyankar, managing director of GTDC Nikhil Desai and others.